कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
आवक क्रमांक- ११२६
दिनांक 15 DEC 2015

बेरोजगारांच्या सेवा सोसायटयांना तसेच लोकसेवा केंद्रांना देण्यात येणा-या विना निविदा कामाच्या मर्यादेत सुधारणा करणेबाबत

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उदयोजकता विभाग
शासन निर्णय क्रमांकः कौविउवि-२०१५/प्र.क्र.९७/रोस्वरो-१
२रा मजला, मंत्रालय ( मुख्य इमारत), मादामा कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
तारीख: ११/१२/२०१५

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः रोजगार व स्वयंरोजगार विभाग,.वि.क्र.रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७/रोस्वरो-१, दि.१७ ऑगस्ट,२००२
२) शासन निर्णय क्रमांकः रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्र.इएसई- २००३/प्र.क्र.१९१/रोस्वरो-१, दि.१ फेब्रुवारी,२००६
३) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग, मातंस/नस्ती क्र.२०१२/प्र.क्र.२७३/३९ दि.२६ नोव्हेंबर,२०१४
४) शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग, मातंस/नस्ती क्र.२०१२/प्र.क्र.२७३/का.३९ दि.१८ डिसेंबर,२०१४

प्रस्तावना -

रोजगार व स्वयंरोजगार धोरणातंर्गत अस्तित्वात असलेल्या बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायटया/ लोकसेवा केन्द्रे यांना आर्थिकदृष्टया बळकट करण्यासाठी त्या करिता असलेल्या कामाशिवाय शासकीय कामे मिळावीत, या उद्देशाने उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील दि.१७ ऑगस्ट,२००२ शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. त्यास अनुलक्षून शासनाच्या विविध प्रशासनिक विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील यंत्रणेकडील कामे सहकारी सेवा सोसायटयांना/ लोकसेवा केंद्रांना उपलब्ध करुन देण्याबाबत वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रके, सूचना इत्यादी, निर्गमित केल्या. बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायटयांना /लोकसेवा केंद्र यांना स्वावलंबी होण्यासाठी अधिक रक्कमेची कामे देण्याची आवश्यकता विचारात घेऊन या सहकारी सेवा सोसायटयांना/लोकसेवा केंद्रांना रु.५ लाख इतक्या रक्कमेची कामे विना निविदा देण्यासाठी उपरोक्त दि.०१ फेब्रुवारी,२००६ चा शासन निर्णय रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत (आताचा कौशल्य विकास व उद्योजकता विभाग) निर्गमित करण्यात आला. आता, सामान्य प्रशासन विभागाने त्यांच्या उपरोक्त दि.२६ नोव्हेंबर,२०१४ च्या शासन निर्णयान्वये रु.३ लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई-निविदा कार्यप्रणाली लागू केली. तसेच दि.१८डिसेंबर,२०१४ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाने ई-निविदा प्रणालीचा वापर शासनाच्या सर्व विभाग, सर्व शासकीय विभागाच्या अधिनस्त असलेली कार्यालये, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम आणि मंडळे यांना बंधनकारक केला आहे. सदर दोन्ही निर्णयास अनुलक्षून बेरोजगारांच्या सेवा सहकारी सोसायटयांना/लोकसेवा केंद्राना देण्यात येणा-या विना निविदा कामाची मर्यादा रु.३ लाखापर्यन्त करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय-

शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र.इएसई-२००३/प्र.क्र.१९१/रोस्वरो-१ दि.१ फेब्रुवारी,२००६ अन्वये राज्यातील बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायटयांना/लोकसेवा केंद्रांना रु.५ लाखापर्यन्तची कामे विना निविदा देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच सदर शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्हयात काम वाटप समिती नियुक्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या होता व समितीने कोणत्या अटी व शर्तीच्या अधिन राहून काम वाटप करावे, हे ही सदर शासन निर्णयान्वये कळविण्यात आले होते. सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त संदर्भाधिन दि.२६ नोव्हेंबर,२०१४ व दि.१८ डिसेंबर,२०१४ च्या शासन निर्णयास अनुलक्षून

आता रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या दि.०१ फेब्रुवारी,२००६ च्या शासन निर्णयात खालील सुधारणा करण्यात येत आहेत.

१) बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायटयांना /लोकसेवा केंद्रांना देण्यात येणा-या विना निविदा कामाची मर्यादा आता रु.५ लाखावरुन रु.३ लाख एवढी करण्यात येत आहे. यानुसार बेरोजगार सहकारी सेवा सोसायटयांना/ लोकसेवा केंद्रांना रु.३लाखापर्यन्तची कामे विना निविदा देता येऊ शकतील. त्यावरील किंमतीच्या कामासाठी ई-निविदा कार्यप्रणालीचा वापर करणे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, त्यांच्या अधिनस्त कार्यालये, शासकीय/निमशासकीय संस्था/ महामंडळे, मंडळे यांना बंधन कारक असेल.

२) शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्र. इएसई-२००३/प्र.क्र.११९/रोस्वरो-१ दि.०१ फेब्रुवारी,२००६ च्या परिच्छेद क्र.५ मधील "अटी व शर्ती" या शिर्षाखालील अ.क्र.४ पुढील प्रमाणे वाचण्यात यावा :- बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थाना रु.३ लाख पर्यन्तची कामे विना निविदा देण्यासाठी रु.३ लाखापेक्षा जास्त कामाचे तुकडे करुन ती सदर संस्थाना देण्यात येऊ नयेत. जे अधिकारी कामाचे तुकडे पाडतील किंवा जे त्याला मान्यता देतील, अशा सर्वांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१२१४१२१६३८४६०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Usha Prakash Mahajan

Digitally signed by Usha Prakash Mahajan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Usha Prakash Mahajan
Date: 2015.12.14 12:18:13 +05'30'

(उ.प्र.महाजन)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. मा.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव
५. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांचे अधिपत्याखालील कार्यालये ( मंत्रालयीन विभागामार्फत)
६. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई

७. सर्व विभागीय आयुक्त,

८. सर्व जिल्हाधिकारी

९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( मंत्रालयीन विभागामार्फत)

१०.सर्व मुख्य अभियंते/ अधिक्षक अभियंते/ कार्यकारी अभियंते सार्वजनिक बांधकाम विभाग/जलसंपदा विभाग ( मंत्रालयीन विभागामार्फत)

११.महालेखापाल, महाराष्ट्र-१ व २ ( लेखा व अनुज्ञेयता), मुंबई

१२.महालेखापाल, महाराष्ट्र-१ व २( लेखापरीक्षा), मुंबई

१३.सर्व उपसंचालक, विभागीय मुख्यालये, कौशल्य विकास , रोजगार व उद्योजकता

१४.सर्व उपनिबंधक /सहायक निबंधक, सहकारी संस्था ( मंत्रालयीन विभागामार्फत)

१५.सर्व सहाय्यक संचालक/जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी

१६.सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग,

१७.निवड नस्ती (रोस्वरो-१)